## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की ,**

माझे नाव – प्रज्वल तानाजी कदम , वय – ५३ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा. – गढीताम्हाणे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

## शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.

०१. दि.१२/०४/२०२४ रोजी पोलिसांनी मला पंच म्हणून एकदवने मौजे रहाटेश्वर येथे यशवंत विश्वास कदम यांना मारहाण झाली होती त्याठिकाणी बोलवले होते. माझ्या सोबत त्यावेळी पोलीस स्टाफ , घटनेतील साक्षीदार ओंकार विलास कदम असे होते. ओंकार विलास कदम याने घटनास्थळ पोलिसांना दाखवले. पोलिसांना तेथे जबाब घेतला , मोजमापे घेतली. पंचनाम्यावर माझी सही घेतली. आता मला दि.१२/०४/२०२४ रोजीचा पंचनामा दाखवला. ती तोच असून त्यावर अ.क्र.१ ची सही माझी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी२/पी.डब्ल्यू २** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

## सर्व आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ए.एम.मागणगावकर यांचे मार्फत.

०२. घटना घडल्यानंतर माझी व फिर्यादीची भेट झाली नव्हती. पंचनाम्यात नमुद केलेला सर्वे नंबर मला फिर्यादीने सांगितला होता. पंचनाम्यावेळी फिर्यादी हजर नव्हता. मी पंचनाम्यातील सर्वे नंबरचा सातबारा त्यावेळी पाहिला नव्हता. हे खरे की, ओंकार विलास कदम व फिर्यादी यांच्या जमिनीतील खाती व सर्वे नंबर वेगवेगळे आहेत. हे खरे की, पंचनाम्यातील सर्वे नंबर मला माहीत नाही, तो पोलिसांनी लिहीला होता. हे खरे की, तो नंबर पोलिसांनी लिहीला आहे त्यामुळे तो खरा आहे असे समजून मी सही केली. हे खरे की, फिर्यादीच्या जमिनीच्या आजुबाजूला कोणते सर्वे नंबर आहेत याबाबत मला काही माहित नाही. हे खरे की, पोलिसांनी फिर्यादीच्या जमिनीच्या आजुबाजूला ज्या जमिनी आहेत असे दाखवले त्यामुळे त्या मी खऱ्या मानल्या. हे खरे की, पोलिसांनी पंचनामा लिहीला व त्यावर मी सही केली, याव्यतिरीक्त काही केले नाही. हे खरे की, फिर्यादी माझा मित्र आहे. हे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यासाठी गेलो होतो. हे खरे नाही की, फिर्यादीला मदत

करण्यासाठी हा खोटा पंचनामा केला व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि. १२/०३/२०२५